“Education for knowledge, science and culture” -Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe




# Vivekanand College, Kolhapur (Empowered Autonomous)

## Department of Political Science

Teacher – Asst. Prof. Ajay P. Patil

B.A. Part III, Paper No. VIII

# Public Administration (लोकप्रशासन)




**Module 1: - Public Administration लोकप्रशासन**

**a)** Meaning, Definition and Nature

अर्थ, व्याख्या आणि स्वरूप

**b)** Evolution, Scope and Importance

विकास, व्याप्ती आणि महत्व

**c)** Private and Public Administration

खाजगी आणि सार्वजनिक प्रशासन (लोकप्रशासन)

# प्रशासन

- इंग्रजीत **Administration** हा शब्द लॅटिन भाषेतील Ad व Ministrare या दोन शब्दांच्या संयोगातून बनलेला आहे. याचा अर्थ **लोकांची काळजी घेणे**, **लोकांची सेवा करणे** असा होतो.
- प्रशासन हा मराठी शब्द **प्र+शास्** या **संस्कृत** धातूपासून निर्माण झालेला आहे. **शास् म्हणजे राज्य करणे,राज्य चालवणे होय.**
- **समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे संघटन, संचालन, संयोजन व नियंत्रण करणे म्हणजे प्रशासन होय.**

# लोकप्रशासनाची व्याख्या

- **प्रो. एल. डी. व्हाईट:-** "लोकप्रशासनात अशा सर्व कृतींचा आणि कार्यांचा समावेश केला जातो की ज्यांचा उद्देश सार्वजनिक धोरणांची पूर्तता किंवा अंमलबजावणी करणे हा असतो."
- **प्रो. वुड्रो विल्सन:-** "कायद्याची तपशीलवार आणि पद्धतशीरपणे कार्यवाही करणे म्हणजे लोकप्रशासन होय. कायद्याच्या कार्यवाहीसाठी केलेली प्रत्येक क्रिया ही प्रशासकीय क्रिया (कायदा) मानली जाते."
- **पर्सी मॅक्वीन:-** "लोकप्रशासन म्हणजे असे प्रशासन की ज्याचा संबंध राष्ट्रीय अथवा स्थानीय सरकारच्या कार्यांशी येतो."

# लोकप्रशासनाचे स्वरूप

- **संकलित किंवा सर्वव्यापी दृष्टिकोण:-**

जेव्हा एखादे उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी संघटनेतील सर्व घटकांचा आणि त्यांच्या सर्व कार्यांचा समावेश लोकप्रशासनाच्या अभ्यासात केला जातो त्यास संकलित किंवा सर्वव्यापी दृष्टिकोण असे संबोधले जाते.

- **व्यवस्थापनात्मक दृष्टिकोण :-**

लोकप्रशासनासंबंधीचा व्यवस्थापनात्मक दृष्टिकोण म्हणजे केवळ व्यवस्थापन करणे, इतरांकडून कार्य करूवून घेणे होय. संघटनेतील सर्व कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या कार्यांचा प्रशासनात समावेश न करता केवळ वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यांचा समावेश करणे होय.

# लोकप्रशासनाचा विकास

- **पहिला कालखंड (१८८७ ते १९२६) :** लोकप्रशासनाच्या उदयाचा कालखंड म्हणून हा कालखंड ओळखला जातो. १८८७ मध्ये अमेरिकेतील प्रिन्सेटन विद्यापीठाचे **प्राध्यापक वुड्रो विल्सन** (नंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले) यांचा **'प्रशासनाचा अभ्यास'** (The Study of Administration) हा लेख प्रकाशित झाला.
- *वुड्रो विल्सन यांना 'सुव्यवस्थित लोकप्रशासनाचे जनक' (The Father of the discipline of Public Administration) असे संबोधण्यात येते.*
- लोकप्रशासनाच्या विकासाच्या या पहिल्या कालखंडात लोकप्रशासन आणि राजकारण यांच्या विलगीकरणाच्या अभ्यासावर (Politics - Administration Dichotomy) अधिक भर देण्यात आला.

- **दुसरा कालखंड (१९२७ ते १९३७)** : लोकप्रशासनशास्त्राच्या विकासाचा हा दुसरा कालखंड. ***हा लोकप्रशासनाच्या अभ्यासाच्या दृष्टीने सुवर्णकाल मानला जातो.*** कारण या कालखंडात लोकप्रशासनाची अनेक तत्वे आणि सिद्धांत निश्चित झाले.
- १९२७ मध्ये प्रो. डब्ल्यू. एफ. विलोबी यांनी 'लोकप्रशासनाची तत्वे (सिद्धांत)' (Principles of Public Administration) हा ग्रंथ लिहिला.
- या कालखंडात लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व वाढत गेले.
- **तिसरा कालखंड (१९३८ ते १९४७):** लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासाला आव्हान देणारा हा कालखंड होय.
- या कालखंडात लोकप्रशासनाच्या सिद्धांतावर आणि तत्त्वावर टीका होऊ लागली.
- नोबेल पारितोषिक विजेते हर्बर्ट सायमन यांनी प्रशासनाला कोणतेही तत्त्व, सिद्धांत असत नाहीत असे ठामपणे मतप्रदर्शन केले.

- **चौथा कालखंड (१९४८ ते १९७०) :** लोकप्रशासनाच्या अभ्यासाचा हा संकटग्रस्त कालखंड होय.
- लोकप्रशासनावर एवढी टीका होऊ लागली की, विचारवंतांनी लोकप्रशासनावरचे वेगळे स्वतंत्र अस्तित्व अमान्य केले.

- **पाचवा कालखंड (१९७१ ते आतापर्यंत) :** पाचव्या कालखंडात लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व वाढले.
- १९७१ पासून आधुनिक लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासाची दिशा बदलली गेली.
- भारतात १९५४ साली भारतीय लोकप्रशासन संस्थेची स्थापना करण्यात आली.
- विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकप्रशासनशास्त्राचा अभ्यास अधिक सुव्यवस्थित व अद्ययावत झालेला आहे.

# लोकप्रशासनाची व्याप्ती

- **हेंरी फेयोल**:

    हेंरी फेयोलने व्यवस्थापनात्मक दृष्टिकोणातून लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे. त्यामध्ये लोकप्रशासनात पुढील पाच तत्वांचा समावेश केला जातो **१) नियोजन (**Planning**)** **२) संघटन (**Organization**)** **३) आज्ञा (**Command**)** **४) समन्वय (**Co-ordination**)** **५) नियंत्रण (**Control**).** प्रशासनात कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वरील पाच तत्वांचा स्वीकार करावा लागतो.

- **पर्सी मॅक्वीन :** यांच्या मते लोकप्रशासनात मानव(Men), भौतिकक वस्तू किंवा सामग्री (Materials) व पद्धती (Methods) या तीन घटकांचा अभ्यास केला जातो.


7 FUNCTIONS
OF
MANAGEMENT
POSDCORB
Coined By Co work of
Luther Gulick and Lyndall
Urwick
1
PLANING
2
ORGANIZATION
3
STAFFING
4
DIRECTING
5
COORDINATION
6
REPORTING
7
BUDGETING

- **ल्युथर ग्युलिक :** यांनी POSDCORB या शब्दावरून लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे.

- **P – Planning: नियोजन/योजना:** कार्याची रूपरेषा ठरविणे तसेच ते कार्य यशस्वी करण्यासाठी योग्य अशी कार्यपद्धती स्वीकारणे.
- **O – Organization: संघटना:** प्रशासन कार्यासाठी विशिष्ट अशी संघटना किंवा रचना निर्माण करावी लागते. विभाग, उपविभाग पाडून अधिकार पदांची रचना करावी लागते.
- **S – Staffing: कर्मचारी वर्गाची व्यवस्था:** प्रशासन कार्यासाठी लागणाऱ्या कुशल, पात्र नोकर वर्गाची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे.
- **D – Directing: निर्णय घेणे, आज्ञा देणे, सूचना व मार्गदर्शन करणे:** प्रशासनात कर्मचारी वर्गाला आदेश, सूचना, मार्गदर्शन करावे लागते.
- **Co - Co-ordination: समन्वय:** संघटनेच्या विविध विभागात परस्पर संबंध प्रस्थापित करून त्यांच्यातील संघर्ष कमी करणे.
- **R - Reporting: माहिती (अहवाल) पाठवणे:** प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासना संबंधी माहिती दिली जाते. तसेच तपासणी, संशोधन आणि नोंदणी याद्वारे माहिती जमवून अहवाल तयार करणे.
- **B - Budgeting: अंदाजपत्रक तयार करणे:** अंदाजपत्रक निर्मिती, त्यास मंजुरी, कार्यवाही, आर्थिक नियंत्रण, हिशेबव्यवस्था इत्यादी गोष्टींचा समावेश आर्थिक प्रशासनात केला जातो.

# लोकप्रशासनशास्त्राचे महत्त्व

- सर्वच प्रगत आणि अप्रगत देशात प्रशासन व्यवस्थेचे महत्त्व मान्य झालेले आहे.
- आधुनिक राज्ये ही लोककल्याणकारी राज्ये म्हणून ओळखली जातात.
- आधुनिक काळात शासन संस्थांचे स्वरूप वारंवार बदलत असते. परंतु तेथील प्रशासकीय यंत्रणा कायमस्वरूपी असलेल्या दिसतात.
- १९३५ च्या कायद्यातील अनेक प्रशासकीय तरतुदी भारतीय संविधानाने जशाच्या तशा स्वीकारलेल्या आहेत.
- तिसऱ्या जगातील अप्रगत राष्ट्रांच्या प्रशासनात सुधारणा घडवून आणणे गरजेचे झाले आहे. प्रशासकीय यंत्रणा अद्ययावत, कार्यक्षम आणि सुव्यवस्थित झाल्याशिवाय तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा विकास होणे अशक्य आहे.
- सुसंस्कृत समाजाची शास्त्रीय गुरुकिल्ली म्हणजे लोकप्रशासन होय. - चार्ल्स ए बिलियर्ड्स

# सार्वजनिक प्रशासन (लोकप्रशासन) व खासगी प्रशासन

- **सार्वजनिक प्रशासन**
- लोकप्रशासन हे सार्वजनिक स्वरूपाचे असते.
- लोकप्रशासनाचे कार्यक्षेत्र व्यापक स्वरूपाचे असते.
- लोकप्रशासनाचे स्वरूप राजकीय व सरकारी असते.
- लोकप्रशासन जनतेला जबाबदार असते.
- लोकप्रशासनाचा मुख्य उद्देश लोककल्याण साधणे हा असतो
- लोकप्रशासनात समानतेचे तत्त्व आढळते.
- लोकप्रशासनात दफ्तरदिरंगाई, लाचलुचपत, भ्रष्टाचार असे दोष निर्माण होतात.

**खासगी प्रशासन**

- खासगी प्रशासन हे व्यक्तिगत स्वरूपाचे असते.
- खासगी प्रशासनाचे कार्यक्षेत्र मर्यादित असते.
- खासगी प्रशासनावर राजकीय पक्षाचे किंवा सत्तेचे नियंत्रण नसते.
- खासगी प्रशासनात जनतेच्या जबाबदारीचा प्रश्नच येत नाही.
- खासगी प्रशासन नफ्यासाठी चालविले जाते.
- खासगी प्रशासनात समानतेचे तत्त्व आढळत नाही.
- याउलट खासगी प्रशासनात हे दोष आढळून येत नाहीत.